**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत विहीर पुनर्भरणाची कामे घेण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्र.मग्रारो २०११/प्रक्र.५६/रोहयो-१०-अ**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : ३ जून, २०११.**

**वाचा: १) शासन निर्णय नियोजन विभाग क्र.मग्रारोहयो २००६/प्र.क्र.१०४/रोहयो-१०, दि.१९/१०/२००६.**

**प्रस्तावना:**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / अल्प भूधारक / इंदिरा आवास योजना व भुसूधार योजनेचे लाभार्थी यांच्या शेतजमिनीवर सिंचन सुविधा पुरविणे अंतर्गत विहीर पुनर्भरणाचे आर्थिक व तांत्रिक मापदंड मुख्य अभियंता व सह सचिव (मग्रारोहयो) तथा तांत्रिक समितीचे अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक समितीच्या दिनांक २६ मे, २०११ रोजी झालेल्या बैठकीत मंजूर करण्यात आलेले आहेत. तद्नुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत विहीर पुनर्भरणाचे मापदंडास मान्यता देऊन व योजनेबाबत सविस्तर सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यापुर्वीही काही जिल्ह्यात, जसे नांदेड, विहीर पुनर्भरणाची कामे करण्यात आली आहेत. तथापि संपूर्ण राज्यासाठी शासन स्तरावरून सर्वसमावेशक मार्गदर्शक सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या परिशिष्ट - १ मध्ये या योजने अंतर्गत घ्यावयाच्या कामांची यादी देण्यात आली आहे. या परिशिष्टाच्या कलम १ (एक) नुसार जलसंधारण व जलसंवर्धनाची कामे घेण्याची तरतूद आहे. या तरतूदीअन्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत विहीर पुनर्भरणाची कामे घेता येतात. आता मग्रारोहयो अंतर्गत विहीर पुनर्भरणाची कामे घेण्याबाबत एकत्रितरित्या सुधारित मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

**१. विहीर पुनर्भरण खर्चाचे आर्थिक व तांत्रिक मापदंड .**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतगत विहिर पुनर्भरण कार्यक्रमांतर्गत १) कच्ची विहीर हलकी जमीन २) कच्ची विहीर भारी जमीन ३) पक्की विहीर हलकी जमीन ४) पक्की विहीर भारी जमीन या कामांच्या पुढील आर्थिक व तांत्रिक मापदंडास शासन मान्यता देत आहे:-

| विहीर पुनर्भरणाची कामे (मजुरीचे दर रु. १२७/- प्रमाणे) | | | |
|---|---|---|---|
| पुनर्भरण विहिरीचा प्रकार | बाब | तांत्रिक मापदंड (मोजमाप मीटरमध्ये) | आर्थिक मापदंड (रुपये) |
| १) कच्ची विहीर (हलकी जमीन) | साठवण खड्ड्याची खोदाई | ३.००X३.००X२.० | ११,६४०/- |
| | शोष खड्ड्याची खोदाई | २.००X२.००X२.०० | |
| | साठवण खड्ड्याकरिता इनलेट | २०.००X(१.२०+०.६०)/२X०.६० | |
| | साठवण खड्डा ते 'शोष खड्ड्याची नाली | २.००X(०.९०+०.६०)/२X०.३० | |
| | शोष खड्ड्याकरीता आऊटलेट | १५.००X(०.९०+०.६०)/२X०.३० | |
| | साठवण खड्ड्याची भराई - दगड | ३.००X३.००X१.०० | |
| | साठवण खड्ड्याची भराई - बारिक दगड | ३.००X३.००X०.५० | |
| | शोष खड्ड्याची भराई - दगड | २.००X२.००X०.४२ | |
| | शोष खड्ड्याची भराई - बारिक दगड | २.००X२.००X०.४२ | |
| | शोष खड्ड्याची भराई - वाळू | २.००X२.००X०.४१ | |
| | पाईपसाठीचे खोदकाम | ६.००X१.००X२.०० | |
| २) भारी जमीन (कच्ची विहीर) | साठवण खड्ड्याची खोदाई | ३.००X३.००X२.०० | ११,३२५/- |
| | 'शोष खड्ड्याची खोदाई | २.००X२.००X२.०० | |
| | साठवण खड्ड्याकरिता इनलेट | २०.००X(१.२०+०.६०)/२X०.६० | |
| | साठवण खड्डा ते 'शोष खड्ड्याची नाली | २.००X(०.९०+०.६०)/२X०.३० | |
| | शोष खड्ड्याकरीता आऊटलेट | १५.००X(०.९०+०.६०)/२X०.३० | |
| | साठवण खड्ड्याची भराई - दगड | ३.००X३.००X१.०० | |
| | साठवण खड्ड्याची भराई - बारिक दगड | ३.००X३.००X०.५० | |
| | शोष खड्ड्याची भराई - दगड | २.००X२.००X०.४२ | |
| | शोष खड्ड्याची भराई - बारिक दगड | २.००X२.००X०.४२ | |
| | शोष खड्ड्याची भराई - वाळू | २.००X२.००X०.४१ | |
| | पाईपसाठीचे खोदकाम | ६.००X१.००X२.०० | |
| ३) पक्की विहीर (हलकी जमीन) | साठवण खड्ड्याची खोदाई | ३.००X३.००X२.०० | १०,३१० |
| | 'शोष खड्ड्याची खोदाई | २.००X२.००X२.०० | |
| | साठवण खड्ड्याकरिता इनलेट | २०.००X(१.२०+०.६०)/२X०.६० | |
| | साठवण खड्डा ते 'शोष खड्ड्याची नाली | २.००X(०.९०+०.६०)/२X०.३० | |

| | | | |
|---|---|---|---|
| | शोष खड्ड्याकरीता आऊटलेट | १५.००X(०.९०+०.६०)/२X०.३० | |
| | साठवण खड्ड्याची भराई - दगड | ३.००X३.००X१.०० | |
| | साठवण खड्ड्याची भराई - बारिक दगड | ३.००X३.००X०.५० | |
| | शोष खड्ड्याची भराई - दगड | २.००X२.००X०.४२ | |
| | शोष खड्ड्याची भराई - बारिक दगड | २.००X२.००X०.४२ | |
| | शोष खड्ड्याची भराई - वाळू | २.००X२.००X०.४१ | |
| | पाईपसाठीचे खोदकाम | ३.००X१.००X२.०० | |
| ४) पक्की विहीर (भारी जमीन) | साठवण खड्ड्याची खोदाई | ३.००X३.००X२.०० | ९,९९५/- |
| | शोष खड्ड्याची खोदाई | २.००X२.००X२.०० | |
| | साठवण खड्ड्याकरिता इनलेट | २०.००X(१.२०+०.६०)/२X०.६० | |
| | साठवण खड्डा ते शोष खड्ड्याची नाली | २.००X(०.९०+०.६०)/२X०.३० | |
| | शोष खड्ड्याकरीता आऊटलेट | १५.००X(०.९०+०.६०)/२X०.३० | |
| | साठवण खड्ड्याची भराई - दगड | ३.००X३.००X१.०० | |
| | साठवण खड्ड्याची भराई - बारिक दगड | ३.००X३.००X०.५० | |
| | शोष खड्ड्याची भराई - दगड | २.००X२.००X०.४२ | |
| | शोष खड्ड्याची भराई - बारिक दगड | २.००X२.००X०.४२ | |
| | शोष खड्ड्याची भराई - वाळू | २.००X२.००X०.४१ | |
| | पाईपसाठीचे खोदकाम | ३.००X१.००X२.०० | |

**३. मग्रारोहयो अंतर्गत विहीर पुनर्भरण कार्यक्रम राबवितांना खालील अनिवार्य आहेत.**

१) ग्राम पंचायत / ग्राम सभा यांचा लाभार्थ्यांच्या निवडीबाबतचा ठराव व शिफारस,

२) प्रत्येक विहीर पुनर्भरणाचे काम हे स्वतंत्र काम समजण्यात यावे.

३) सर्व प्रकारच्या अकुशल कामासाठी जॉबकार्ड आवश्यक आहे.

४) ज्या लाभार्थ्याला विहीर पुनर्भरणाचा लाभ देण्यात येणार आहे तो जॉबकार्डधारक असला पाहिजे. तसेच त्याने मजूर म्हणून काम करुन मजूरी घेणे आवश्यक आहे.

५) मग्रारोहयोच्या मार्गदर्शक सूचनानुसार हजेरीपत्रक ठेवणे, बँक किंवा पोस्टामार्फत मजूरीचे प्रदान करणे, इत्यादी कार्यपध्दतीचा अवलंब झाला पाहिजे.

६) या योजने अंतर्गत कंत्राटदार / ठेकेदार यांना बंदी राहील.

७) मग्रारोहयो अंतर्गत विहीर पुनर्भरणाचे काम करतांना कुशल भागाचे काम करण्यासंदर्भात दिनांक ५.१०.२०१० च्या शासन निर्णयाप्रमाणे अकुशल व कुशल कामाचे ६०:४० हे प्रमाण कामाच्या वार्षिक एकत्रित प्रमाणानुसार ठेवणे आवश्यक आहे.

८) सदर कामे करतांना मजूर स्थानिक असावा.

९) अकुशल मजुरांना हजेरीपत्रकाद्वारे मजुरी प्रदान करणे अनिवार्य राहील व अर्धकुशल / कुशल मजुरांना पावतीद्वारे (Voucher) प्रदान करण्यास हरकत नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

वि. /७/१२२/
( व्ही. गिरीराज )
प्रधान सचिव (रोहयो)

प्रती,

सचिव, (ग्राम विकास) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
आयुक्त, कृषी, पुणे,
संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे,
मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे,
सर्व उप सचिव /अवर सचिव /कक्ष अधिकारी (मग्रारोहयो), नियोजन विभाग,मंत्रालय, मुंबई
निवडनस्ती, कार्यासन रोहयो-१०-अ, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.